एमीचे कडे



लेखिका: योशिको उचिदा; चित्रे: जोआन्ना यार्डले

“मी ही कडे हातातून कधीच काढणार नाही,” आपल्या सर्वात प्रिय मैत्रिणीने, लॉरी मेडिसनने भेट दिलेले सोन्याची कडे हातात घालता घालता एमी म्हणाली. एमी आणि तिच्या कुटुंबियांना अमेरिकी सरकार एका तुरुंग शिबिरात स्थानबद्ध करत होते. सर्व जपानी-अमेरिकी लोकांना या शिबिरातच राहावे लागणार होते. ते वर्ष होते 1942. अमेरिका आणि जपान यांच्यात युद्धाची ठिणगी पेटली होती.

सात वर्षे वयाच्या एमीला आपली मित्रमंडळी, शाळा आणि घर सोडायची अजिबात इच्छा नव्हती. पण आपण जपानी-अमेरिकी असल्यामुळे आपल्यापुढे दुसरा पर्याय नाही, असे तिच्या आईने तिला सांगितले. आईला वाईट वाटेल म्हणून एमीने आपले दु:ख तिच्यासमोर व्यक्त केले नाही. पण शिबिराच्या पहिल्या दिवशी, आपल्या हातातील कडे हरवल्याचे लक्षात येताच तिला खूप रडावेसे वाटले. “आता मी माझ्या सगळ्यात आवडत्या मैत्रिणीची आठवण कशी ठेवू?” एमीच्या मनात दाटून आले.

दुसऱ्या महायुद्धादरम्यान जपान-अमेरिकेदरम्यान युद्ध झाले. त्या पार्श्वभूमीवर एका लहान मुलीचे भावनिक विश्व लेखिका *योशिको उचिदा* यांनी या गोष्टीत मांडले आहे.

मोठ्या बहिणीने आपल्याला रडताना पाहू नये, असे एमीला वाटू लागले. तिने लगेच डोळ्यांतील अश्रू पुसले. पण त्यामुळे तिच्या मनातील दुःख काही पुसले गेले नाही.

“चला, निघायची वेळ झाली,” तिच्या आईने हाक दिली.

एमीने तिच्या खोलीत पाहिले. इतर खोल्यांसारखी तीही रिकामी झाली होती. अगदी भेटवस्तुच्या रिकाम्या खोक्यासारखी ती भासत होती.

एमीने डोळे बंद केले आणि आपल्या जुन्या खोलीचे स्मरण केले. खोलीच्या खिडकीवर फुलांची नक्षी असलेले पडदे होते, खोलीत कपड्यांचा पसारा होता, तिची आवडती चिंध्यांची बाहुली आणि टेडी बीयर होते. बंद डोळ्यांआड तिला हळूहळू संपूर्ण घराचे दृश्य दिसू लागले.

एमी आणि तिच्या कुटुंबियांना घर सोडायची इच्छा नव्हती. अमेरिका आणि जपान यांच्यात युद्ध सुरू झाल्यामुळे आणि एमीचे कुटुंब जपानी-अमेरिकी असल्यामुळे सरकारच त्यांना तुरुंग शिबिरात स्थानबद्ध करत होते.

त्यांनी काही गुन्हा केला नव्हता. पण त्यांना सरकारकडूनच शत्रुसारखी वागणूक मिळू लागली. केवळ, ते शत्रुसारखे दिसत होते म्हणून! एफबीआयने बाबांना *मोंटाना* राज्यात असलेल्या युद्धकैद्यांच्या शिबिरात केवळ एवढ्याचसाठी पाठवले, कारण ते एका जपानी कंपनीत काम करत होते.

एमीला हा शुद्ध वेडेपणा वाटला. त्यांचे अमेरिकेवर प्रेम होते, पण अमेरिका त्याबदल्यात त्यांना प्रेम देत नव्हती, त्यांच्यावर विश्वास दाखवत नव्हती.



घंटीचा आवाज ऐकताच एमी दरवाजाकडे धावली. कदाचित, बटणाबटणांचा गणवेश घातलेला एखादा उंचपुरा सरकारी नोकर दारात उभा असू शकेल, सरकारकडून काही चूक आली आहे आणि आता त्यांना शिबिरात जावे लागणार नाही, असा निरोप घेऊन तो आला असेल, अशी खुळी आशा तिला वाटू लागली.



पण एमीने दरवाजा उघडला तेव्हा दारात तिची सर्वात प्रिय मैत्रीण *लॉरी मेडिसन* उभी होती. लॉरी आणि एमी शाळेत एकाच वर्गात शिकत होत्या.

लॉरी शाळेत एकत्र जाण्यासाठी एमीकडे आली नव्हती, रोलर स्केटींग खेळण्यासाठी एमीला बोलवायला आली नव्हती, आपला नवा पोषाख दाखवायलाही आली नव्हती की दुकानात सोबत जाण्यासाठी बोलवायला आली नव्हती.

लॉरी एमीसाठी एक भेटवस्तू घेऊन आली होती. जणू काही ती एमीच्या वाढदिवसालाच आली होती. पण तिने वाढदिवसाला साजेसे छान छान कपडे घातले नव्हते. उलट, एमीसारखीच तीसुद्धा दुःखी दिसत होती.

“हे घे,” तिने भेटवस्तू लॉरीच्या हातात दिली. “हे कडे आहे. शिबिरात जवळ ठेव, माझी आठवण म्हणून.”



लॉरीने कडे एमीच्या हातात चढवायला मदत केली. ते कडे म्हणजे एक सोन्याची चैन होती. त्यावर हृदयाच्या आकाराचा ताईत लटकत होता. पाहाताक्षणीच एमी त्याच्या प्रेमात पडली.

“मी हे कडे हातातून कधीच काढणार नाही, अगदी आंघोळ करतानासुद्धा!” एमीने वचन दिले.

लॉरीने एमीला मिठी मारली. “चल, निघते मी. लवकर परत ये,” लॉरीने एमीचा निरोप घेतला.

“नक्की,” एमी म्हणाली. पण आपण *बर्कली*ला परतू याची तिला खात्री वाटत नव्हती. कदाचित, आपण लॉरीला पुन्हा कधी भेटूही शकणार नाही, अशी शंका तिच्या मनात डोकावली.

लॉरी नजरेआड होईपर्यंत एमी तिच्या पाठमोऱ्या आकृतीला पाहात राहीली. लॉरी अधूनमधून वळून बघत होती. दोघी एकमेकांना हात हलवून निरोप देत होत्या.

एमीला फार वाईट वाटले. तिने दरवाजा धाडकन बंद केला.





दरवाजाची घंटी पुन्हा वाजली. दारात त्यांची शेजारीण मिसेस सिम्पसन होती. ती त्यांना जपानी-अमेरिकी लोकांच्या केंद्रात नेण्यासाठी आली होती.

"एमी, तुझ्या वस्तू सोबत घे. निघायची वेळ झालीय," एमीची बहीण रिको म्हणाली.

एमीने मनगटावरील कडे सुरक्षित असल्याची खात्री करून घेतली. मग तिने स्वेटर आणि कोट अंगावर चढवले. कारण ते ठेवण्यासाठी बॅगेत जागाच शिल्लक नव्हती. ती आपल्यासोबत हलक्याफुलक्या वस्तूच नेऊ शकत होती. प्रत्येक कुटुंबाला एक क्रंमांक दिलेला होता. एमीने आपल्या बॅगेवर 13453 या क्रमांकाचा बिल्ला लावला.

आईने प्रत्येक खोलीत डोकावले, घराकडे शेवटचे पाहून घेतले. एमी तिच्या मागोमाग घरभर फिरली. फर्निचर, कपडे, चित्रे आणि पुस्तकांनी भरलेल्या पूर्वीच्या खोल्या एमीला आठवू लागल्या.

बाबांना प्रिय असलेल्या बागेवर एमीने शेवटची नजर टाकली. बाबा इथे असते तर त्यांनी बागेतील एखादे सुंदर फूल तोडून आईला दिले असते आणि म्हणाले असते, "हे तुझ्यासाठी!" हलकेच स्मित करत आईने फूल फुलदाणीत सजवून ठेवले असते.

पण आता बाग जीर्ण आणि उजाड झाली होती. बाबा निघून गेल्यावर आईला बागेची निगराणी राखण्यास कधी फुरसतच मिळाली नाही. एमीलासुद्धा त्या बागेसारखे उपेक्षित, एकाकी वाटू लागले.



केंद्रात एमीला सर्वत्र शेकडो जपानी-अमेरिकी लोक दिसले. त्यात आजी-आजोबा, आई-बाबा, मुलं, तान्ही बाळं असे सगळ्या वयांचे लोक होते. प्रत्येकाकडे गाठोडी होती, क्रमांकाचा बिल्ला लावलेल्या बॅगा होत्या. काही लोक रडत होते. बरेच लोक शांत बसून होते. एमीच्या पोटात गोळा आला. सगळे आपल्यासारखेच घाबरलेले असतील का, असा प्रश्न तिच्या मनात उद्भवला. तिने हातातील कड्यावर असलेल्या हृदयाच्या ताईतावर हात ठेवला. आणि आपण शूर आहोत, असे स्वतःला बजावले.

पण प्रत्येक दारावर उभ्या असलेल्या बंदुकधारी सैनिकांना पाहून मात्र एमीचे अवसान गळाले. तिचे पाय लटपटू लागले.

“कुणी पळून जाऊ लागले तर ते गोळ्या घालतील का गं?” तिने बहिणीला विचारले.

रिकोने खांदे उडवले. “मला माहीत नाही,” ती गंभीर चेहरा करून म्हणाली. “कदाचित, घालतीलही गोळ्या.”



थोड्या वेळाने, सर्व लोक फुटपाथच्या कडेला उभ्या असलेल्या एका बसमध्ये चढले. त्या सर्वांना *टॅनफोरान रेसट्रॅक* येथे नेत होते. घोड्यांच्या शर्यतीसाठी प्रसिद्ध असलेल्या या ठिकाणी सैन्यदलाने कैद्यांचे शिबिर बनवले होते.

बस सुरू झाली. तो रस्ता एमीच्या चांगल्याच परिचयाचा होता. ती खिडकीतून बाहेर बघू लागली. बस *केटो* किराणा दुकानाजवळून जाऊ लागली. आई तिथे धान्य, दही, केक, मसाले आणि मुळा वगैरे खरेदी करत असे.

दुकानाच्या खिडक्या बंद होत्या. पण एमीला दुकानाच्या दरवाजावर एक फलक दिसला. त्यावर लिहिले होते, “आम्ही देशभक्त अमेरिकी आहोत.”

“मीसुद्धा देशभक्त आहे,” एमीच्या मनात आले. “आम्ही सगळेच देशभक्त आहोत. पण सैन्याला तसं वाटत नाही.”


बस सॅनफ्रान्सिस्कोच्या खाडीच्या पुलावरून जाऊ लागली. सूर्यप्रकाशात तो पूल चमचमत होता.

"गुड बाय पुला, गुड बाय खाडी, गुड बाय सिगल पक्ष्यांनो," एमी कुजबुजली.

एमीने शेजारी बसलेल्या आपल्या बहिणीकडे नजर टाकली. आपले रडू आवरण्याचा ती आटोकाट प्रयत्न करत होती.

"मूर्ख सैनिक आणि त्यांचे मूर्ख युद्ध!" रिको पुटपुटली.

लवकरच, ते टॅनफोरान रेसट्रॅकवर पोहोचले. त्या जागेला काटेरी तारांचे कुंपण घातले होते. प्रत्येक कोपऱ्यावर सुरक्षा रक्षकांचे मनोरे उभारले होते. सशस्त्र सुरक्षा रक्षकांनी दरवाजा उघडला आणि बस आत घेतल्यावर लगेच पुन्हा बंद केला. आता कुणीही बाहेर जाऊ शकत नव्हते. सर्व लोक आत बंदी झाले होते.



त्यांना 16 क्रमांकाच्या बराकीतील 40 क्रमांकाच्या खोलीत जागा दिली. बाबांचे मित्र, *मिस्टर नोमा* यांनी त्यांना खोली शोधायला मदत केली.

रेसट्रॅकभोवती सैन्याच्या बराकी होत्या. पण ही बराक त्या बराकींपैकी नव्हती. खरंतर, हा घोड्यांचा तबेला वाटत होता, अनेक कप्पे असलेला. प्रत्येक कप्प्यावर क्रमांक टाकलेला होता. पूर्वी त्यात घोडे राहात असावेत.

“ही तुमची खोली,” 40 क्रमांकाच्या खोलीपाशी आल्यावर मिस्टर नोमा म्हणाले.

एमी आणि रिको खोलीत डोकावल्या. “बापरे! किती गलिच्छ आहे ही खोली!”

खोलीत काळोख होता, धूळ होती, कचरा होता, घोड्यांची दुर्गंधी पसरली होती. आतील जमिनीवर जाड कापड पसरले होते. त्यावर लाकडाचे ढलपे, खिळे, धूळ आणि मेलेली ढेकणे दिसत होती. सैनिक झोपण्यासाठी वापरतात तो पलंग जमिनीवर दुमडून ठेवलेला होता.

दोघींना थोडे बरे वाटावे म्हणून आई म्हणाली, “मी मिसेस सिम्पसन यांना पडदे पाठवायला सांगते. थोडी साफसफाई केल्यावर ही खोली छान दिसेल.” आईला आपल्याइतकेच वाईट वाटत आहे, हे एमी समजून चुकली. कुणाला काहीच बोलावेसे वाटत नव्हते.

मिस्टर नोमा त्यांच्यासाठी गाद्या आणायला गेले. “लवकर गेलं पाहिजे, नाहीतर गाद्या संपून जातील,” ते घाईघाईत जाताजाता म्हणाले. एमीच्या आईला ते रडताना पाहू शकत नव्हते.

पण आई काही रडलीबिडली नाही. कुठूनतरी झाडू आणून तिने खोलीतील धूळ, कचरा आणि मेलेली ढेकणे स्वच्छ केली.



एमी आणि रिको यांनी पलंग नीट एका जागी ठेवला.


तेवढ्यात एमीचे लक्ष तिच्या मनगटाकडे गेले आणि ती किंचाळली, “माझ्या हातातलं कडं कुठे गेलं?”

एमीने खोलीतील कोपरानकोपरा धुंडाळला. तबेल्यात पाऊल टाकल्यापासून ज्या वाटेवरून ते खोलीपर्यंत आले, त्या वाटेवर त्यांनी शोधले. आईने आणि रिकोने तिला कडे शोधायला मदत केली, पण कुणालाच ते सापडले नाही.

रात्र होऊ लागली. सर्वत्र गर्द काळोख पसरला. आईने टॉर्च काढला आणि ती कडे शोधायला रेसट्रॅकवर गेली. रेसट्रॅकवर चिखलच चिखल होता. आदल्या दिवशी पडलेल्या पावसामुळे ठिकठिकाणी पाण्याची डबकी साचली होती. आईने खूप शोधाशोध केली, पण एमीचे कडे काही तिला मिळाले नाही.



रात्रीच्या जेवणाची वेळ झाली. एमी, आई आणि रिको जेवणाच्या लांब रांगेत उभ्या राहिल्या. रांगेतील सर्वांच्या हातात थाळी आणि काटे-चमचे होते. पण एमीला जेवणाचे भान नव्हते. तिला फक्त आपले हरवलेले कडे डोळ्यासमोर दिसत होते. आपल्या प्रिय मैत्रिणीची एकमेव आठवण हरवल्याचे तिला खूप दु:ख झाले. तिला खूप रडावेसे वाटले.



. पुढच्या दिवशी एमीने आपली बॅग उघडली. तिला तिचा आवडता लाल स्वेटर त्यात दिसला. लॉरीकडेसुद्धा असाच लाल स्वेटर होता. दोघींनी शाळेच्या पहिल्या दिवशी हेच स्वेटर अंगावर घातले होते. दोघींच्या जेवणाचे डबेसुद्धा एकसारखेच होते.

शाळा सुटल्यावर दोघी घराजवळच्या माळरानावर पतंग उडवायला जात असत. त्यांचे लाल-पिवळे पतंग वाऱ्यावर नाचताना पाहायला त्यांना खूप मजा येत असे.


अचानक एमीला जाणवले की आपल्याला लॉरीसोबत घालवलेले आनंदी क्षण आठवत आहेत, बर्कलीतील घराची एक-एक खोली आठवावी तसेच. म्हणजे, कडे हरवले तरी आपल्याला लॉरीच्या आठवणी येऊ शकतात!




मिस्टर नोमा यांनी त्यांचे सामान ठेवण्यासाठी काही फळ्या आणल्या. भंगारातील लाकडांपासून त्यांनी टेबल आणि बाकडेसुद्धा बनवले.

आईने फळीवर सर्वात आधी बाबांचा फोटो ठेवला. पण बाबांची आठवण काढायला आईला या फोटोची गरज नाही, हे एमी जाणत होती.

आईच्या मनातही हाच विचार आला असावा. ती म्हणाली, “एमी, लॉरीची आठवण काढायला तुला कड्याची गरज नाही, जसं बाबांची आठवण काढायला आपल्याला या फोटोची गरज नाही. खरंतर, आपण ज्यावर प्रेम करतो त्या गोष्टी आपल्या हृदयात कायम वसत असतात. त्यामुळे त्यांच्यापासून कुठे दूर गेलं तरी त्यांची आठवण मनात कायम ताजी राहाते.”



एमीला आईचे बोलणे पटले. लवकरच त्यांना आणखी दूर, *उटाह* राज्यातील वाळवंटात असलेल्या एका शिबिरात पाठवणार होते. पण तिथे गेल्यावर लॉरी काही तिच्या मनातून निघून जाणार नव्हती. तिथेसुद्धा तिला लॉरीची आठवण येणारच होती. लॉरी कायमच तिची मैत्रीण राहाणार होती, तिला कुठेही आणि कितीही दूर पाठवले तरी. आपण लॉरीला कधीच विसरू शकणार नाही, हे एमीला पक्के ठाऊक झाले.





लेखकाचे शब्द

1942 साली अमेरिका व जपान यांच्यात युद्ध सुरू झाले. अमेरिकी सरकारने देशाच्या पश्चिम किनाऱ्यावरील 1,20,000 जपानी-अमेरिकी लोकांना ताब्यात घेऊन कैद केले. यांपैकी दोन-तृतीयांश लोक अमेरिकी नागरिक होते.

या लोकांनी काही बेकायदेशीर कृत्य केले नव्हते. पण कोणताही खटला दाखल न करता, सुनावणी न घेता त्यांना निर्जन रेसट्रॅकमध्ये बंदी बनवण्यात आले आणि नंतर दूर कुठेतरी स्थानबद्ध करण्यात आले.

1976 साली अध्यक्ष *गेराल्ड आर फोर्ड* म्हणाले, “जपानी-अमेरिकी हे निष्ठावंत अमेरिकी होते. त्यांना कैदी बनवण्याचा निर्णय चुकीचा होता.”

1982 साली अध्यक्ष *जिमी कार्टर* आणि अमेरिकी काँग्रेस यांनी स्थापन केलेल्या समितीने सखोल अभ्यास करून निष्कर्ष काढला की जपानी-अमेरिकी लोकांवर घोर अन्याय करण्यात आला. याला जातीय पूर्वग्रह, युद्धाचा उन्माद आणि राजकीय नेतृत्वाचे अपयश या गोष्टी कारणीभूत होत्या.

सहा वर्षांनी, अमेरिकी सरकारने अधिकृतपणे या अन्यायाची कबुली दिली आणि माफी मागितली. सरकारने अन्यायग्रस्त लोकांच्या वंशजांचे पुनर्वसन करून प्रतिकात्मक रितीने पूर्वजांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

समाप्त